(इंग्रजीत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

**मुंबई येथील उच्च न्यायालयाच्या न्यायाधिकारात**

**नागपूर खंडपीठ, नागपूर**

**फौजदारी अर्ज (ए. पी. एल ) क्रमांक 365/2024**

नरेंद्र कुमार संतराज शर्मा,

वय 39 वर्षे, व्यवसाय-नोकरी,

राहणार- गंगसारी, रायबरेली, उत्तर प्रदेश .......**<u>अर्जदार</u>**

**विरुद्ध**

1) महाराष्ट्र राज्य,

पोलीस स्टेशन अधिकाऱ्यामार्फत,

पोलीस स्टेशन- अचलपूर, तालुका अचलपूर,

जिल्हा-अमरावती

2) सौ. अनुष्का विजय बेलोकर,

वय 46 वर्षे, व्यवसाय-नोकरी,

राहणार- 14, सदानंद नगर,

स्वयंवर लॉन्स जवळ, तालुका-अचलपूर,

जिल्हा-अमरावती ....... **<u>गैर-अर्जदार (अनेक)</u>**

---

अर्जदारासाठी अधिवक्ता श्री. एस. ए कानेटकर

गैर-अर्जदार क्र. 1 साठी श्री. एच. आर धुमाळे, अतिरिक्त सरकारी वकील,

गैर-अर्जदार क्र. 2 साठी अधिवक्ता श्रीमती कीर्ती देशपांडे.

---

**न्याय मंच :** **न्यायमूर्ति अविनाश जी. घरोटे आणि**

**न्यायमूर्ति अभय जे. मंत्री**

**न्यायनिर्णय राखून ठेवल्याचा दिनांक : 02-12-2024**

**न्यायनिर्णय अधिघोषित करण्याचा दिनांक : 16-01-2025**

**मौखिक न्यायनिर्णय : (न्यायमूर्ति अभय जे. मंत्री द्वारे)**

पक्षकारांच्या विद्वान वकिलांच्या संमतीने अंतिम सुनावणी केली.

2. अर्जदाराने दिनांक 29-04-2021 रोजी पोलीस स्टेशन - अचलपूर येथे भारतीय दंड संहिता, 1860 (थोडक्यात '**आयपीसी**') च्या कलम 354-ए आणि 354-डी अंतर्गत दंडनीय गुन्हा क्रमांक 125/2021 मध्ये दाखल करण्यात आलेला प्रथम खबरी अहवाल (थोडक्यात '**एफआयआर**') आणि सदर एफआयआर च्या अनुषंगाने दाखल करण्यात आलेला दोषारोपपत्र क्र. 31 / 2021 आणि न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, न्यायालय

क्र. 3, अचलपूर यांच्यासमोर प्रलंबित असलेला नियमित फौजदारी खटला (थोडक्यात - 'आरसीसी') क्र. 184/2021 रद्द करण्याची मागणी केली आहे.

3. सदर खटल्याची तथ्ये पुढीलप्रमाणे आहेत :-

(ए) अर्जदार फिनले मिल, अचलपूर, जिल्हा-अमरावती (थोडक्यात-"मिल") येथे सह-व्यवस्थापक म्हणून काम करत होता, जो भारत सरकारचा एक उपक्रम आहे. गैर-अर्जदार क्र. 2 देखील मिलमध्ये प्रशिक्षण विभागात प्रशिक्षण प्रभारी म्हणून काम करते.

(बी) दिनांक 29-04-2021 रोजी, गैर-अर्जदार क्र. 2 ने अर्जदाराविरुद्ध तक्रार दाखल केली ज्यात असे आरोप करण्यात आले आहे की, अर्जदाराने तिला जाणूनबुजून त्रास दिला; तो तिच्याकडे वाईट नजरेने पाहतो आणि तिला गलिच्छ शब्दांनी शिवीगाळ करतो, ज्यामुळे तिला स्वतःची लाज वाटते. तो तिला सांगत असे की ती साडीत मादक दिसते.

(सी) सदर तक्रारीच्या आधारावर, अर्जदाराविरुद्ध गुन्हा क्र. 125/2021 दाखल करण्यात आला.

4. अर्जदाराचे विद्वान वकील श्री. एस. ए कानेटकर यांनी जोरदार युक्तिवाद केला की, अर्जदाराने कोणताही गुन्हा केलेला नाही, परंतु त्याला प्रस्तुत गुन्ह्यात खोटे गोवण्यात आले आहे कारण अर्जदाराने दिनांक 23-04-2-2021 रोजी गैर-अर्जदार क्र. 2 ने त्याला थप्पड मारल्यामुळे तिच्याविरुद्ध उच्च अधिकाऱ्यांकडे तक्रार केली होती.

याचा बदला घेण्यासाठी, गैर-अर्जदार क्र. 2 ने अर्जदाराविरुद्ध खोटी तक्रार केली. सदर तक्रारीच्या आधारावर, अधिकाऱ्यांनी आंतरिक तक्रार समिती (थोडक्यात, "आयसीसी") मार्फत चौकशी करायला लावली, जी समिती कामाच्या महिलांच्या छळाच्या संदर्भात तक्रारी हाताळते. तसेच, सात सदस्यीय समितीने सहाय्यक व्यवस्थापक आणि मानव संसाधन विभागाचे प्रमुख यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय चौकशी केली. त्यांनी दोन्ही चौकशी अहवालांकडे आमचे लक्ष वेधले आणि सादर केले की दोन्ही चौकशीत, अर्जदाराला गैर-अर्जदार क्रमांक 2 ने त्याच्याविरुद्ध केलेल्या आरोपांतून मुक्त करण्यात आले होते, जे सिद्ध झाले नव्हते. सहाय्यक व्यवस्थापक आणि मानव संसाधन विभाग प्रमुखांच्या अध्यक्षतेखालील चौकशी समितीने असे निरीक्षण नोंदवले की, *"अर्जदार क्रमांक 2 ने महिला असल्याचा अनुचित फायदा घेत खोटा रिपोर्ट दाखल केला आणि अर्जदाराला निर्दोष ठरविले"*. म्हणून त्यांनी सादर केले की, ***आशू सुरेंद्रनाथ तेवरी विरुद्ध पोलीस उपअधीक्षक, इओडब्ल्यू, सीबीआय आणि इतर, (2020) 9 एससीसी*** च्या प्रकरणात दिलेला आदेश लक्षात घेता, प्रथम खबरी अहवाल आणि अर्जदाराविरुद्ध सुरू केलेली पुढील कार्यवाही रद्द करून बाजूला ठेवण्यासाठी हा योग्य प्रकरण आहे.

शेवटी त्यांनी असा युक्तिवाद केला की, एफआयआर मधील आरोप अस्पष्ट आणि अनियत आहेत आणि म्हणूनच, अर्जदाराविरुद्ध गुन्ह्याचे कोणतेही घटक सिद्ध

झालेले नाहीत. त्यामुळे एफआयआर आणि फौजदारी कारवाई रद्द करण्यासाठी हे योग्य प्रकरण आहे, अशी विनंती त्यांनी केली आहे.

5. याउलट गैर अर्जदार क्र. 1/ राज्यासाठी विद्वान अतिरिक्त सरकारी वकील आणि गैर अर्जदार क्र. 2 साठी विद्वान अधिवक्ता श्रीमती कीर्ती देशपांडे यांनी या आधारावर अर्जाचा विरोध केला की, एफआयआर मध्ये केलेले आरोप आणि साक्षीदारांच्या जबानीवरून अर्जदार गैर-अर्जदाराचा छळ करत होता आणि पाठलाग करत होता हे प्रथमदर्शनी सूचित होते. त्यामुळे अर्जदाराने कोणताही गुन्हा केल्याचा दिसून येत नाही, असे म्हणता येणार नाही. त्यांनी पुढे असा युक्तिवाद केला की, अर्जदार गुन्ह्यात सामील होता, हे दाखविण्यासाठी त्याच्याविरुद्ध पुरेसे पुरावे आहे; म्हणून त्यांनी सदरहू अर्ज फेटाळण्याची विनंती केली.

6. आम्ही पक्षकारांच्या परस्परविरोधी युक्तिवादांचा विचार केला आहे आणि प्रथम खबरी अहवाल, दोषारोपपत्र आणि **आशू सुरेंद्रनाथ तेवरी (वरील)** च्या प्रकरणातील निर्णयाचा अवलोकन केला आहे, ज्यावर अर्जदाराच्या विद्वान वकिलाने विश्वास दर्शविला होता.

7. सुरुवातीला असे दिसते की अर्जदार मिल मध्ये सह-व्यवस्थापक (तांत्रिक) म्हणून काम करत होता आणि गैर-अर्जदार क्र. 2 ही त्याच्या हाताखाली प्रशिक्षण विभागात 'प्रशिक्षण प्रभारी' म्हणून काम करत होती.

8. एफआयआर आणि साक्षीदारांच्या जबानीवरून पुढे असे दिसून येते की, दुपारी 3:30 च्या सुमारास जेव्हा अर्जदार त्याच्या कार्यालय/चेंबर जवळून जात होता, तेव्हा गैर-अर्जदार क्र. 2 त्याच्याकडे गेली आणि तिने अचानक त्याच्या चेहऱ्यावर/गालावर दोन थप्पड मारली. तिथे उपस्थित साक्षीदारांनी दोघांनाही धरून ठेवले. गैर-अर्जदार क्र. 2 ला बरे वाटत नव्हते आणि त्यामुळे तिला रुग्णालयात नेण्यात आले.

9. दुसऱ्या दिवशी म्हणजे दिनांक 24-04-2021 रोजी अर्जदाराने या घटनेबद्दल महाव्यवस्थापकाकडे तक्रार दाखल केली. तदनुसार महाव्यवस्थापकाने सहाय्यक व्यवस्थापक आणि इतर सहा जणांच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यीय समिती गठित केली. चौकशी केल्यानंतर समितीने असे मत व्यक्त केले की, "चौकशी समितीसमोर नोंदवलेल्या विधानांवरून हे स्पष्टपणे सिद्ध झाले आहे की, ***अनुष्का बेलोरकर (म्हणजे गैर अर्जदार क्र. 2) ने महिला असण्याचा गैरफायदा घेऊन दिनांक 29-04-2021 रोजी महाव्यवस्थापकासमोर खोटा रिपोर्ट दाखल केला आहे*** आणि चौकशीची संपूर्ण कार्यवाही, पुरावे आणि दोषारोपपत्र **नरेंद्र शर्मा (म्हणजे अर्जदार) यांनी दिनांक 24-04-2021 रोजी दाखल केलेली तक्रार खरी असल्याचे सिद्ध करते आणि त्यामुळे चौकशी समितीचे सर्व सदस्य निष्कर्षावर येतात आणि त्यांनी असे घोषित केले की , महाव्यवस्थापकासमोर गैर-अर्जदार क्र. 2 ने अर्जदाराविरुद्ध दाखल केलेला रिपोर्ट पूर्णपणे खोटा आहे".**

10. दिनांक 24-04-2021 च्या घटनेनंतर आणि अर्जदाराने दिनांक 24-04-2021 रोजी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल केल्यानंतर, तिने दिनांक 28-04-2021 रोजी 'आयसीसी' कडे अर्जदाराविरुद्ध तक्रार दाखल केली आणि दिनांक 29-04-2021 रोजी आक्षेपित एफआयआर दाखल केला.

11. पुढे असे दिसून येते की, 'आयसीसी' ने देखील चौकशी केली आणि असे मत व्यक्त केले की-

“(1) **श्रीमती अनुष्का बेलोकर यांनी नरेंद्र शर्मावर केलेले लैंगिक छळाचे आरोप सिद्ध झालेले नाहीत.**

(2) **श्रीमती अनुष्का बेलोकर यांनी श्री. नरेंद्र शर्मावर केलेल्या लैंगिक/अश्लील टिप्पणीचे आरोपही सिद्ध झालेले नाहीत',**

आणि म्हणूनच असे मत व्यक्त केले की, "**अर्जदारावर केलेले आरोप सिद्ध झाले नाहीत आणि त्यामुळे तो दोषी आढळला नाही.**”

'आयसीसी'' ने पुढे शिफारस केली की-

“ (1) **नरेंद्र शर्मावर केलेले आरोप सिद्ध न झाल्यामुळे नरेंद्र शर्माला आरोपातून मुक्त केले जाऊ शकते,**

(2) आयसीसीचे मत आहे की, मिल्स/संघटित संस्थामध्ये लैंगिक छळ अधिनियमाविषयी जागरूकता कार्यक्रम आवश्यक आहे.

12. हे लक्षात घेणे योग्य आहे की, गैर-अर्जदार क्र. 2 ने तिच्या तक्रारीत आरोप केला आहे की, ऑगस्ट 2017 पासून अर्जदार तिला जाणूनबुजून त्रास देत होता; तो तिच्याकडे वाईट नजरेने पाहत असे आणि तिला गलिच्छ शब्दांनी शिवीगाळ करत असे, ज्यामुळे तिला स्वतःची लाज वाटायची. तो तिला सांगत असे की ती साडीत मादक दिसते आणि तिचा पाठलाग करण्याचा प्रयत्न करत असे. तथापि अर्जदाराने दिनांक 24-04-2021 रोजी तिच्याविरुद्ध तक्रार दाखल करेपर्यंत, तिने अर्जदाराविरुद्ध कोणत्याही वरिष्ठ अधिकाऱ्याकडे कोणतीही तक्रार केली नव्हती किंवा कोणाशीही संपर्क साधला नव्हता, परंतु प्रथमच जेव्हा तिने अर्जदाराला थप्पड मारली आणि अर्जदाराने तिच्याविरुद्ध तक्रार केली; त्यानंतर केवळ बदला घेण्यासाठी तिने वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल केली आणि दिनांक 29-04-2021 रोजी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. वरील विधानाव्यतिरिक्त तिने त्याच्याविरुद्ध इतर कोणतेही आरोप केलेले नाहीत.

13. मिलच्या इतर कर्मचाऱ्यांच्या म्हणजेच कमलेश गाडगे, सागर गाधवे, योगेश निमजे, प्रणाली बाळापुरे, पुष्पा हिरपुरकर आणि इतर साक्षीदारांच्या जबानीचे अवलोकन केल्यावर असे दिसते की, कोणत्याही साक्षीदाराने गैर-अर्जदार क्र. 2 च्या कथनाला दुजोरा दिलेला नाही किंवा त्याचे समर्थन केलेले नाही. जरी त्यांनी दिनांक 23-04-2021 रोजीची घटना सांगितली आहे आणि असे म्हटले आहे की, त्यानंतर त्यांना कळले की वर आरोप केल्याप्रमाणे, अर्जदार हा गैर-अर्जदार क्र. 2 चा छळ करत

होता आणि तिचा पाठलाग करत होता, तथापि कोणत्याही कर्मचाऱ्याने कोणत्याही वेळी ते पाहिले नव्हते किंवा त्याबद्दल त्यांच्या जबाबात म्हटले नव्हते. याउलट त्यांच्या जबानीवरून असे दिसून येते की, दिनांक 23-04-2021 रोजी जेव्हा घटना घडली, तेव्हा गैर-अर्जदार क्र. 2 ने अर्जदाराच्या गालावर/चेहऱ्यावर दोन थप्पड मारली. अभिकथन केल्याप्रमाणे, अर्जदार जर ऑगस्ट 2017 पासून गैर-अर्जदार क्र. 2 ला त्रास देत होता आणि पाठलाग करत होता, तर निश्चितच तिने याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्याकडे तक्रार केली असती किंवा अर्जदाराविरुद्ध रिपोर्ट दाखल केला असता. त्याचप्रमाणे मिलमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी म्हणजे साक्षीदारांनीही तेच सांगितले असते, परंतु कोणत्याही साक्षीदाराने गैर-अर्जदार क्र. 2 च्या कथनाला दुजोरा दिलेला नाही किंवा त्याचे समर्थन केलेले नाही आणि अर्जदाराने गैर-अर्जदार क्र. 2 विरुद्ध तक्रार दाखल केल्यानंतरच, तिने त्याच्याविरुद्ध वरिष्ठ अधिकाऱ्याकडे तक्रार केली आणि पोलिस ठाण्यात रिपोर्ट दाखल केला.

14. **आशू सुरेंद्रनाथ तेवरी (वरील)** च्या प्रकरणात, माननीय सर्वोच्च न्यायालयाने '**राधेश्याम केजरीवाल विरुद्ध पश्चिम बंगाल राज्य, (2011) 3 एससीसी 581**' च्या प्रकरणातील परिच्छेद '**38**' चा संदर्भ दिला. हे लक्षात घेण्यासारखे आहे की माननीय सर्वोच्च न्यायालयाने, विविध न्यायनिर्णयांचा विचार केल्यानंतर, परिच्छेद '38' मधील त्या निर्णयांचे गुणोत्तर काढले आणि असे म्हटले आहे की जर परिच्छेद क्र. 38 (vii)

मधील मापदंड लागू केला गेला असता, तर त्याच तथ्यांवर 'सीव्हीसी' अहवाल (या प्रकरणात 'आयसीसी' अहवाल वाचल्यावर, अपीलकर्त्याला निर्दोष ठरविले गेले असते. समान तथ्यांचा समावेश असलेल्या फौजदारी खटल्यांमध्ये दोषसिध्दीची शक्यता धूसर दिसते. म्हणून त्यामधील त्यातील अपीलकर्त्याला भारतीय दंड संहिता अंतर्गत गुन्ह्यांपासून मुक्त करण्यात आले. सदर न्यायनिर्णयाचे परिच्छेद '38' आणि '39' पुढीलप्रमाणे वाचावे :-

*“38. या निर्णयांमधून जे गुणोत्तर काढले जाऊ शकते ते व्यापकपणे खालीलप्रमाणे सांगितले जाऊ शकते :-*

*(i) अभिनिर्णयाची कार्यवाही आणि फौजदारी खटला एकाच वेळी सुरू केला जाऊ शकतो;*

*(ii) फौजदारी खटला सुरू करण्यापूर्वी अभिनिर्णयाच्या कार्यवाहीत निर्णय घेणे आवश्यक नाही.*

*(iii) अभिनिर्णयाची कार्यवाही आणि फौजदारी कारवाई एकमेकांपासून स्वतंत्र स्वरूपाची असतात.*

*(iv) अभिनिर्णयाच्या कार्यवाहीत खटला चालवणाऱ्या व्यक्तीविरुद्धचा निष्कर्ष फौजदारी खटल्याच्या कार्यवाहीवर बंधनकारक नाही;*

*(v) अंमलबजावणी संचालनालयाद्वारे अभिनिर्णयाची कार्यवाही म्हणजे राज्यघटनेच्या <u>अनुच्छेद 20 (2)</u> किंवा फौजदारी प्रक्रिया संहितेच्या <u>कलम 300</u> च्या तरतुदींना लागू करण्यासाठी सक्षम न्यायालयाद्वारे खटला चालवणे नाही;*

*(vi) अभिनिर्णयाच्या कार्यवाहीत समान उल्लंघनासाठी खटल्याला सामोरे जाणाऱ्या व्यक्तीच्या बाजूने काढलेले निष्कर्ष हे निष्कर्षाच्या स्वरूपावर अवलंबून असेल. अभिनिर्णयाच्या कार्यवाहीतील दोषमुक्ती जर तांत्रिक आधारावर असेल आणि गुणवत्तेवर नसेल, तर खटला चालू राहू शकतो आणि*

***(vii) तथापि, दोषमुक्तीच्या बाबतीत, आरोप अजिबात टिकाऊ नसल्याचे आढळून आल्यास आणि व्यक्ती निर्दोष असल्याचे आढळून आल्यास, त्याच तथ्यांच्या आणि परिस्थितीच्या संचावर फौजदारी खटला चालू ठेवण्याची परवानगी दिली जाऊ शकत नाही आणि मूलभूत तत्त्व हे फौजदारी प्रकरणांमध्ये पुराव्याचे उच्च मानक आहे.***

*39. म्हणूनच आमच्या मते, अभिनिर्णयाच्या कार्यवाहीत तसेच तसेच खटला चालवण्याच्या कार्यवाहीत केलेले अभिकथन समान आहे की नाही आणि अभिनिर्णयाच्या कार्यवाहीत संबंधित व्यक्तीची निर्दोष मुक्तता गुणवत्तेवर आहे काय हे ठरवणे हाच निकष असेल. जर ती अश्या गुणवत्तेवर आढळली की*

*अभिनिर्णयाच्या कार्यवाहीत कायद्याच्या तरतुदींचे कोणतेही उल्लंघन झाले नाही, तर संबंधित व्यक्तीवर खटला न्यायालयीन प्रक्रियेचा गैरवापर मानला जाईल".*

15. प्रस्तुत प्रकरणात, सुरुवातीला, मानव संसाधन विभागाच्या सहाय्यक व्यवस्थापकाच्या अध्यक्षतेखालील समितीने इतर सहा जणांसह स्पष्टपणे असे मत व्यक्त केले की, "*अर्जदार क्र. 2 ने अर्जदाराविरुद्ध दिनांक 29-04-2021 रोजी खोटा रिपोर्ट दाखल केला आणि अर्जदाराला या चौकशीत निर्दोष मुक्त करण्यात आले* ". त्याचप्रमाणे, सविस्तर चौकशीचा विचार केल्यानंतर, 'आयसीसी' ने असे मत व्यक्त केले की, '*अर्जदारावरील आरोप सिद्ध झाले नाहीत आणि त्याला आरोपांपासून मुक्त करण्यात आले आहे*'. हे लक्षात घेण्यासारखे आहे की महाव्यवस्थापक समोर दाखल केलेल्या तक्रारीत तसेच प्रथम खबरी अहवालात आरोपित तथ्ये एकसारखीच आहेत आणि म्हणूनच आमच्या मते, **आशू सुरेंद्रनाथ तेवरी** (वरील) च्या बाबतीत दिलेले हुकूम या प्रकरणात पूर्णपणे लागू होते.

16. **हरियाणा राज्य आणि इतर विरुद्ध भजनलाल आणि इतर , 1992 पुरवणी (1) एससीसी 335** च्या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 482 मध्ये अंतर्निहित अधिकारांचा वापर करताना पालन करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे निश्चित केली आहेत. तथ्यांच्या संदर्भात, आम्हाला असे आढळले आहे की अर्जदाराचे

प्रकरण मार्गदर्शक तत्त्वे क्र. (i), (iii) आणि (v) खाली येईल, जे पुढीलप्रमाणे वाचण्यात येते :-

*i) जेथे प्रथम खबरी अहवालात किंवा तक्रारीत केलेले आरोप, जरी ते त्यांच्या दर्शनी मूल्यावर घेतले गेले आणि ते पूर्णपणे स्वीकारले गेले, तरी प्रथमदर्शनी कोणत्याही गुन्ह्याची पुष्टी करत नाहीत किंवा आरोपींविरुद्ध खटला तयार करत नाहीत;*

*ii) .............*

*iii) जेथे एफआयआर किंवा तक्रारीत केलेले निर्विवाद आरोप आणि त्याच्या समर्थनार्थ गोळा केलेले पुरावे कोणत्याही गुन्ह्याचा खुलासा करत नसतील किंवा आरोपींविरुद्ध खटला तयार करत नाहीत;*

*iv) .............*

*v) जेथे एफआयआर किंवा तक्रारीत केलेले आरोप इतके निरर्थक आणि स्वाभाविकपणे अशक्य आहेत की ज्याच्या आधारे कोणताही विवेकी व्यक्ती कधीही असा निष्कर्ष काढू शकत नाही की आरोपीविरुद्ध कारवाई करण्यासाठी पुरेसे कारण आहे;*

17. अशा प्रकारे, जरी गैर-अर्जदार क्र. 2 च्या मते अर्जदार ऑगस्ट 2017 पासून तिचा छळ करत होता आणि तिचा पाठलाग करत होता आणि तिने स्वतःला एक कार्यकर्ती

आणि कर्मचाऱ्याची प्रतिनिधी असल्याचा दावा केला, तरी तिने त्याच्याविरुद्ध वरिष्ठ अधिकाऱ्याकडे किंवा 'आयसीसी' कडे कोणतीही तक्रार केली नाही, हे स्पष्ट आहे. तिने प्रथम खबरी अहवाल उशीरा दाखल करण्याचे कोणतेही कारण दिलेले नाही. तक्रारीतील आरोपांचे साधे अवलोकन केल्यास प्रथमदर्शनी असे दिसून येत नाही की गैर-अर्जदार क्र. 2 ने अर्जदाराविरुद्ध तिचा छळ केल्याचा किंवा तिचा पाठलाग केल्याचा कोणताही विशिष्ट आरोप केला आहे. प्रथम खबरी अहवाल आणि साक्षीदारांच्या नोंदवलेल्या जबाबात, अभिकथन केल्याप्रमाणे, असे दिसून येत नाही की, अर्जदार गैर-अर्जदार क्र. 2 ला त्रास देत होता किंवा तिचा पाठलाग करत होता. भारतीय दंड संहितेच्या कलम 354-ए आणि 354-डी अंतर्गत दंडनीय गुन्हा ठरवणारा कोणताही विशिष्ट आरोप अर्जदाराविरुद्ध आढळत नाही. अर्जदाराविरुद्ध लावलेले आरोप अस्पष्ट आणि अनियत आहेत. याउलट असे दिसते की, अर्जदाराने दिनांक 24-04-2-2021 रोजी गैर-अर्जदार क्र. 2 विरुद्ध उच्च अधिकाऱ्याकडे तक्रार केली होती आणि याचा बदला घेण्यासाठी, अर्जदाराला खोट्या तक्रारीत अडकवून त्याच्यावर दबाव टाकण्याची शक्यता नाकारता येत नाही.

18. थोडक्यात, असे दिसते की अर्जदाराविरुद्ध केलेले आरोप सामान्य आणि अस्पष्ट आहेत, जे प्रथमदर्शनी गैर-अर्जदार क्रमांक 2 ने आरोप केल्याप्रमाणे कोणताही गुन्हा ठरत नाहीत. त्यामुळे या प्रकरणातील तथ्ये, सहाय्यक व्यवस्थापक, मानव संसाधन

विभाग आणि 'आयसीसी' च्या अध्यक्षतेखालील 'समितीने' नोंदवलेले निष्कर्ष तसेच माननीय सर्वोच्च न्यायालयाने दिलेला आदेश लक्षात घेता, असे दिसते की अर्जदाराने या न्यायालयाच्या अंतर्निहित अधिकारांचा वापर करण्यासाठी खटला दाखल केला आहे. फौजदारी खटल्यांचा सामना करणे हे एक गंभीर प्रकरण आहे ज्यामध्ये भरपूर पुरावा असल्याशिवाय एखाद्याला ढकलले जाऊ शकत नाही. केवळ त्याच्या विरुद्ध किंवा कोणत्याही साक्षीदाराने एका विशिष्ट घटनेचा उल्लेख न करता अर्जदार गुन्ह्यात सामील होता असे सामान्य आणि अस्पष्ट आरोप करून, त्याला खटल्याला सामोरे जाण्यास भाग पाडणे योग्य ठरणार नाही.

19. वरील पार्श्वभूमीवर, अर्जदाराविरुद्ध सुरू केलेली कार्यवाही रद्द करणे आम्हाला योग्य वाटते. परिणामी, प्रार्थना केल्याप्रमाणे अर्जास परवानगी दिली जाते. भारतीय दंड संहिता, 1860 च्या कलम 354-ए, 354-डी अंतर्गत दंडनीय गुन्ह्यांसाठी पोलीस स्टेशन-अचलपूर येथे गुन्हा क्रमांक 125/2021 अन्वये दाखल करण्यात आलेला प्रथम खबरी अहवाल आणि सदर एफआयआरच्या अनुषंगाने गुन्हा क्रमांक 125/2021 मध्ये दाखल करण्यात आलेला दोषारोप पत्र आणि न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, न्यायालय क्र. 3, अचलपूर यांच्यासमोर प्रलंबित असलेला नियमित फौजदारी खटला क्र. 184/2021 याद्वारे रद्द केला जातो आणि बाजूला ठेवला जातो. तदनुसार न्यायचौकशी न्यायालयास कळविण्यात यावे.

20. एखादा अर्ज प्रलंबित असल्यास तो निकाली काढला जातो.

**(न्यायमूर्ति अभय जे. मंत्री)** **(न्यायमूर्ति अविनाश जी. घरोटे)**

**अस्वीकरण**

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याचा/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणीकरिता वैध मानला जाईल".

XXXXX